**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# उद्योन्मुख संशोधकांची संख्या वाढावी - डॉ.पी.बी. पाब्रेकर
## अविष्कार संशोधन स्पर्धा

अमरावती-

विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागून उद्योन्मुख संशोधकांची संख्या वाढावी, यासाठी अविष्कार स्पर्धा महत्वाचे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या अविष्कार सेलचे माजी राज्य समन्वयक डॉ.पी.बी. पाब्रेकर यांनी केले. विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्यावतीने अविष्कार २०१८ 'क्रिएटिव्ह इनोव्हेशन्स फॉर स्किल इंडिया' या विषयावर जागृती व उद्बोधन कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी एम.बी.ए. विभागाच्या सभागृहात करण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, आय.आय.एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. संतोष सदार, अविष्कार सेलचे समन्वयक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार उपस्थित होते.

डॉ. पाब्रेकर म्हणाले, १९९७ साली अश्वमेध, २००३ साली इंद्रधनुष्य आणि त्यानंतर अविष्कार व आव्हान सारख्या स्पर्धा राज्यपाल कार्यालयाने महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु केल्यात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने ह्या स्पर्धा महत्वाच्या आहेत. या स्पर्धांमधून संशोधक, कलावंत, खेळाडू देशपातळीवर तयार झाले आहेत. अमरावती विद्यापीठाच्या संशोधकांची कामगिरी उत्तम राहिली आहे.

यावर्षी गोंडवाना विद्यापीठात अविष्कार स्पर्धा, वाय.सी.एम.ओ.यु., नाशिक येथे इंद्रधनुष्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आव्हान आणि मुंबई विद्यापीठामध्ये क्रीडा महोत्सव स्पर्धांचे आयोजन होत असल्याची माहिती देवून ते म्हणाले, अविष्कार स्पर्धेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना खूप अवधी आहे. अमरावती विद्यापीठांतर्गत सर्व विद्यार्थी जोरदार तयारी करतील आणि आविष्कार स्पर्धेत पदके व पारितोषिके प्राप्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, संशोधन हा विषय जिव्हाळ्याचा असणे काळाची गरज आहे. समाजाच्या समस्यां सोडविण्यासाठी शिक्षणाचा उपयोग व्हावा. संशोधनाने समाजाच्या समस्यां सुटु शकतात, त्यामुळे नाविन्यपूर्ण संशोधन करण्याचा माईंडसेट प्रत्येक विद्यार्थ्यांनी बनवण्याची गरज आहे.

अविष्कार स्पर्धेतून कुमारीमातेचा प्रश्न मांडण्यात आला, त्यावर अमरावती विद्यापीठाने खूप मोठे कार्य केले आहे. भारतात केवळ दोन टक्के संशोधन होत आहे, आणि ते अत्यल्प आहे. संशोधनाची संख्या वाढावी, यासाठी अविष्कार स्पर्धा हे उत्तम व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न पडायला पाहिजेत; शिक्षणाच्या पलीकडे सुद्धा जग आहे आणि त्यासाठी संशोधन करायचे असून समाजाकडे उघड्या डोळ्याने बघा, समाजाच्या समस्यां सुटण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाच्या विचारप्रवाहाची प्रक्रिया सुरु करावी, असे आवाहन सुद्धा त्यांनी केले.

याप्रसंगी अविष्कार सेल समितीचे गठण करण्यात आले. त्यामध्ये डॉ. सुजाता काळे, डॉ. नरेंद्र शेलुकार, डॉ. प्रशांत गावंडे, डॉ. मोना चिमोटे, डॉ.एस.डी. कतोरे, डॉ.पी.ए. वाडेगांवकर, डॉ.डी.वाय. चाचरकर यांचा समावेश करण्यात आला.

सुरुवातीला माता सरस्वती व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत रोपटं देवून विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार व डॉ.पी.ए. वाडेगांवकर यांनी केले. डॉ.पी.बी. पाब्रेकर यांचा शॉल, श्रीफळ देवून कुलगुरु डॉ. मुरलीधकर चांदेकर यांनी सत्कार केला. स्वागतपर भाषण आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले यांनी केले. प्रास्ताविक अविष्कार सेलचे समन्वयक डॉ. आनंद अस्वार यांनी केले. बारामतीचे प्रा. विनय नागलकर यांनी याप्रसंगी दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन केले. त्यानंतर पॅनल डिस्कशन करण्यात आले. संचालन डॉ. सुजाता काळे यांनी, तर आभार डॉ.पी.ए. वाडेगांवकर यांनी मानले. कार्यक्रमाला एल.एल.एल.चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, हिंदी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.डी.वाय. चाचरकर, सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. नितीन फिरके व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　　दि. १७/०९/२०१८ .

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी